20-01-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 01/19/2025 10:38 PM Page 1



# ‘खांडोळा येथे सांस्कृतिक, आधुनिक कलांचे दर्शन’

## ‘सम्राट क्लब’तर्फे ‘सम्राट लोकसरिता’ कार्यक्रम | राष्ट्रीय युवा दिन

टीम दैनिक हेराल्ड



**साखळी, दि. १९ :** गोमंतकीय वारसा आणि युवा प्रतिभांचा गौरव साजरा करणारा भव्य कार्यक्रम सम्राट लोकसरिता’ सम्राट क्लब खांडोळा आणि कला व संस्कृती संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने नोनूस व्हिलेज घ्या संगीता हॉल, खांडोळा, माशेल येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने करण्यात आले होते, ज्यामध्ये गोमंतकीय सांस्कृतिक परंपरा आणि आधुनिक कलांचे दर्शन घडवले गेले.

कार्यक्रमाची सुरुवात गोवा क्एठए (त्रेल्क्एठए) कला प्रदर्शन’ याने झाली, ज्यामध्ये गोमंतकीय वारसा आणि आधुनिक विषयांवर आधारित कलाकृती सादर करण्यात आल्या. या प्रदर्शनामध्ये शुभम गावडे, मुद्रिका च्यारी, संतोषी गुईन, तुषार पाटील, अर्दन दामोदर नाईक, महादेव बोर्डेकर, प्रतीक च्यारी, दर्शन नाईक, स्नेहल मिठारी, आरती कुरतरकर, सुजल विजय शिरोडकर, मंदा शिंदे, साईल पेडणेकर, राहुल साळगावकर, दक्षिका धावजेकर कलाकारांनी सहभाग घेतला होता, तसेच, नानू जाल्मी यांनी पारंपरिक वाद्यांचे आणि अजय तळपे यांनी संगीत श्रवण करण्यासाठी वापरण्यात येणारी जुनी यंत्राचे प्रदर्शन सादर करून गोव्याच्या संगीत आणि कलावारशाची झळक दिली.

उद्घाटन सोहळा पार पडला. मुख्य अतिथी डॉ. रोहित फळगावकर (सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग – संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य महाविद्यालय विर्नोडा, पेडणे यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. सन्माननीय पाहुणे म्हणून सम्राट अविन नाईक (भूतपूर्व अध्यक्ष, सम्राट क्लब आंतरराचचतय, राज्य–१) उपस्थित होते. तसेच, विशेष आमंत्रितांमध्ये पुढील मान्यवरांचा समावेश होता. प्रवीण सबनीस – अध्यक्ष, सम्राट क्लब आंतरराष्ट्रीय, राज्य–

शैलेंद्र नाईक – अध्यक्ष, राष्ट्रीय युवक दिन, रुपेश लिंगडकर – ब्लॉक अध्यक्ष, सम्राट क्लब आंतरराष्ट्रीय, राज्य–१ यानंतर, सम्राट लोकसरिता ची सुरुवात झाली. गोव्याच्या लोकसांस्कृतिक परंपरेवर आधारित घुमट, फुगडी, दिवली नृत्य, दिवजा नृत्य, मुसळ नृत्य, देकणी नृत्य, कट्टी नृत्य, आणि गोफ नृत्य यांसारख्या विविध नृत्यप्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. याचबरोबर, सम्राट रामचंद्र शेट नार्वेकर यांनी ‘गोव्याचा वारसा’ या विषयावर थेट चित्रकलेचे सादरीकरण केले.

कार्यक्रमाच्या समारोप सत्रात, रात्री ८.४५ वाजता, उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवा व्यक्तींना युवा आयकॉन’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन्मानित व्यक्तींची नावे खालीलप्रमाणे आहेत:

संपदा शेणवी कुंकळयेकर – साहित्य, रोहन कळंगुटकर – चित्रकला, मृगया परेश फडते – संगीत. सागर गावडे – चित्रकला, गोविंदराज तारी – क्रीडा. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून कला व संस्कृती व क्रीडा आणि युवक व्यवहार मंत्री मा. श्री. गोविंद गावडे उपस्थित होते. सन्माननीय पाहुणे म्हणून दयानंद भगत (प्रसिद्ध चित्रकार ) आणि सम्राट दीपक नार्वेकर (भूतपूर्व अध्यक्ष, सम्राट क्लब आंतरराष्ट्रीय राज्य–१ व उपमहाव्यवस्थापक, जीटीडीसी) यांनी व्यासपीठा भुषवल. त्याशिवाय, व्यासपीठावर सम्राट अक्षय खांडेपारकर (जनसंपर्क संचालक, सम्राट क्लब आंतरराष्ट्रीय), सम्राट रुपेश लिंगडकर (ब्लॉक अध्यक्ष, सम्राट क्लब आंतरराष्ट्रीय, राज्य–१) आणि सम्राट हनुमंत मांजरेकर (उपाध्यक्ष) उपस्थित होते. मुख्य पाहुण्यांनी या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले आणि गोव्याच्या सांस्कृतिक परंपरा जतन करणाऱ्या कलाकारांचे अभिनंदन केले. अध्यक्ष सम्राट विनीत कुंडईकर यांनी मान्यवरांचे स्वागत केले, तर प्रकल्पाचे अध्यक्ष सम्राट निखिल साळगांवकर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सम्राट वैभवी गावकर आणि कु. प्रणिता सावंत यांनी केले. कार्यक्रमाच्या स्मृतिचिन्ह वितरणाच्या सत्राचे सूत्रसंचालन सम्राट अनिकेत भगत व सम्राट निखिल साळगांवकर यांनी केले. ‘सम्राट लोकसरिता’ हा कला, संस्कृती, आणि युवक सक्षमीकरणाचा संगम असलेला कार्यक्रम ठरला, ज्याला गोव्याभरातील कला आणि संस्कृती प्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# साखळी जनता दरबारास नागरिकांचा प्रतिसाद

टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १९ :** मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांचा आत्मविश्वास गेल्याकाही दिवसापासून बराच वाढलेला आहे. राज्याच्या सेवेसाठी न थकता १८ तास काम करणारे मुख्यमंत्री व लोकांना सहज उपलब्ध होणारा नेता म्हणूनही परिचिय आहेत.

रविवारी साखळी येथे जनता दरबारात पाचशेहून अधिक लोकांच्या वेगवेगळ्या प्रकारची गाऱ्हानी ऐकून घेतली. अनेकांचे प्रश्नच तात्काळ सोडवले. भाजपचे नवे प्रदेशाध्यक्ष निवडून आलेत.

त्यावेळी लोकांचा उत्साह मोठा होता. नव्या जोमाने काम करण्याचा संकल्प करताना मुख्यमंत्र्यांनी २०२७ निवडणुकीवर डोळा ठेवून काम सुरू करण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहनही केले आहे.

२०२७ मध्ये २७ आमदार निवडून यावेत यासाठी आतापासूनच ध्यास घेतलेला दिसतोय. तसेच त्या पूर्वी ग्रामपंचायत नगरपालिका व जिल्हा पंचायत निवडणुका विक्रमी विजय मिळावा या साठी सज्ज राहण्याचा निर्धार केलेला आहे. येत्या मार्च महिन्यात मुख्यमंत्री मुख्यमंत्र्यांची सलग सहा वर्षे पूर्ण करतील. त्याचबरोबर २०२७ मध्ये पुन्हा एकदा डॉ. प्रमोद सावंत यांच्या मुख्यमंत्री पदाखाली निवडणुकीला सामोरे जाण्याची तयारी आतापासूनच सुरू झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

त्यामुळे मुख्यमंत्री बरेच खुश व समाधानी दिसतात. काही लोकांनी वादळ उठवत अनेक अफ़वा पसरवल्या त्यामुळे काही प्रमाणात मुख्यमंत्री मंत्री व्यथित दिसत होते मात्र आता ते फॉर्मात असून अनेक महत्वाकांक्षी धाडसी निर्णय घेण्यास त्यांनी सुरू केले आहे. आगामी काळात त्याची जनतेला प्रचिती येईलच.



साखळी : जनता दरबारात लोकांची गाऱ्हानी समजून घेताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत.

जनता दरबारातगेली काही वर्षे मुख्यमंत्री शेकडो लोकांच्या समस्या समजून घेत बऱ्याच वेळात तात्काळ निर्णय घेणे यात मुख्यमंत्री माहेर असून जबरदस्त आकालन शक्ती तसेच दुसऱ्याच्या वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तम जाण व माहिती लक्षात ठेवण्याची कसब यामुळे त्यांचा जनता दरबार दिवसेंदिवस लोकप्रिय ठरत आहे. रविवारी व्यस्थ वेळापत्रक असूनही त्यांनी पाचशे लोकांची भेट घेत भिवंपाची गरज ना असा संदेश देत लोकांचे प्रश्न समजून घेतले.

## पान १ वरून

### महाकुंभात आग : १८० तंबू खाक

झालेली नाही. परिस्थिती नियंत्रणात आहे.
महाकुंभ नगरीमध्ये अग्निशमन कार्यासाठी प्रगत वैशिष्ट्यांसह ४ आर्टिक्युलेटिंग वॉटर टॉवर तैनात करण्यात आले आहेत. यामध्ये व्हिडिओ–थर्मल इमेजिंगसारख्या प्रगत प्रणाली आहेत. बहुमजली आणि उंच तंबूंची आग विझवण्यासाठी याचा वापर केला जातो. ही यंत्रणा ३५ मीटर उंचीपर्यंत आग विझवू शकते.
महाकुंभमेळा परिसर आगमुक्त करण्यासाठी येथे ३५० हून अधिक अग्निशमन दल, २ हजाराहून हून अधिक प्रशिक्षित मनुष्यबळ, ५० अग्निशमन केंद्रे आणि २० अग्निशमन चौक्यांची निर्मिती करण्यात आली आहे. रिंगण आणि तंबूंमध्ये अग्निसुरक्षा उपकरणे लावण्यात आली आहेत.

---

### मवीन श्रेडिंग मशिन्सच्या बिघाडामुळे नागरिक संतप्त

मशीन्सची त्वरित दुरुस्ती करायला हवी होती, असे फर्नांडिस म्हणाले.
वाढत्या कचऱ्याच्या संकटावर तोडगा काढण्यासाठी तात्काळ कारवाई करण्याची मागणी या ब्रेकडाउनमुळे तीव्र झाली आहे. रहिवासी आणि स्थानिक नेते सर्वसमावेशक कचरा व्यवस्थापन आराखडा आणि पुढील पर्यावरण आणि आरोग्य धोके टाळण्यासाठी श्रेडिंग मशीनची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी करत आहेत.सोनसोडो येथील परिस्थिती बिकट होत असताना, प्रभावी आणि शाश्वत कचरा व्यवस्थापन उपायांची अंमलबजावणी करण्यासाठी मडगाव नगरपालिकेवर दबाव वाढत आहे.

---

### पर्यटकांची सुरक्षा धोक्यात

घटनेनंतर सावध केले होते. मी दोन वर्षांपासून ही लढाई लढत आहे. पंचायतीच्या आक्षेप आणि समुदायाच्या इशाऱ्यांनंतरही, कोलवा येथे बेकायदेशीर पॅराग्लायडिंग सुरू आहे, असे ते म्हणाले.
रहिवासी आणि पर्यटक दोघांच्याही सुरक्षेशी तडजोड होत आहे यावर भर देत त्यांनी अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेबद्दल टीका केली. या समस्येचे निराकरण करण्यासाठी उचलण्यात अधिकारी अपयशी ठरले आहेत. पुढील जीवितहानी टाळण्यासाठी त्वरित हस्तक्षेप आवश्यक आहे, यावर रॉड्रिग्स यांनी जोर दिला.
केरीच्या दुःखद घटनेने कठोर नियमन आणि अंमलबजावणीची मागणी पुन्हा केली आहे. स्थानिक रहिवासी आणि कार्यकर्ते अधिकाऱ्यांना बेकायदेशीर पॅराग्लायडिंग ऑपरेशन्स थांबवण्यासाठी आणि गोव्याच्या सर्वात लोकप्रिय समुद्रकिनाऱ्यांपैकी एकावर सुरक्षा उपायांची खात्री करण्यासाठी त्वरीत कारवाई करण्याची विनंती करत आहेत.

---

### हिंद महासागरात चीनशी टक्कर घेण्यासाठी भारताच्या युद्धनौका सज्ज

त्यामुळे त्यांना सहसा दोन ते तीन दिवसांत पाण्याबाहेर यावे लागते. याशिवाय आयएनएस वागशीरमध्ये अद्याप टॉर्पेडोसारखी शस्त्रे बसवण्यात आलेली नाहीत. टॉर्पेडोचा करार २०१७–१८ मध्ये रद्द करण्यात आला होता. वास्तविक, व्हीआयपी हेलिकॉप्टर बनवणारी वेस्टलँड कंपनी टॉर्पेडोची निर्मिती करत असे.त्यानुसार पाणबुडीची रचना करण्यात आली होती. पण जेव्हा वेस्टलँड घोटाळ्यानंतर हा करार रद्द झाला, तेव्हा हा करारही अडचणीत आला. आता पाणबुडी कार्यान्वित झाली आहे, पण टॉर्पेडो नाहीत. संरक्षण क्षेत्रासंदर्भातील निर्णयांना होणारा विलंब हा भारतीय नौदलाच्या विकासातील सर्वात मोठा अडथळा आहे. साधारणपणे, भारत आपल्या लांबलचक सीमारेषेवर अधिक लक्ष केंद्रित करतो, कारण पाकिस्तान आणि चीन सारख्या प्रतिस्पर्धी देशांशी त्याची लांब सीमा आहे.बहुतेक लक्ष लडाख किंवा पाकिस्तानसोबतच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेसारख्या जमिनीच्या सीमांवर आहे. सागरी सीमेकडे तितकेच लक्ष दिले गेले नाही. धोरणकर्त्यांचे लक्षही कमी होते आणि निधीही तेवढा दिला गेला नाही. याशिवाय संरक्षण निर्मितीमध्ये भारत अजूनही चीनच्या मागे आहे.भारताने नुकत्याच तयार केलेल्या पाणबुड्या, फ्रिगेट्स आणि विध्वंसकांना तयार करण्यासाठी तीन ते चार वर्षे लागली.


फॉर्म डब्ल्यूआयएन 43
(नियम 100 पहा)
मुंबई येथील राष्ट्रीय कंपनी कायदा लवाद
खंडपीठ यांचेसमोर

**ब्राऊन पॅकेजिंग सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड यांचे प्रकरणात**
(कंपनी कायदा, 2013 अनुसार ऐच्छिक परिसमापन अंतर्गत)
(कंपनी कायदा, 2013 खाली स्थापन केलेली कंपनी)
याचिका क्र. सीपी/20 (एमबी) 2024
**धनकोंना त्यांचे दावे सिद्ध करण्यासाठी नोटीसची जाहिरात**

याद्वारे उपरनिर्दिष्ट नावाच्या कंपनीच्या धनकोंना नोटीस देण्यात येते की, त्यांनी उपरनिर्दिष्ट नावाच्या कंपनीविरुद्ध त्यांची संबंधित कर्जे किंवा दाव्यांचे पुरावे त्यांच्या संबंधित नावे, पत्ते व कर्ज वा दाव्याचा तपशील आणि कंपनी कायदा, 2013च्या कलम 326/327 खाली प्राधान्याचे कोणतेही शीर्षक यासह फॉर्म डब्ल्यूआयएन 43मधील दावे किंवा कर्ज सिद्ध करणारे प्रतिज्ञापत्र कंपनी लिक्वीडेटरच्या कार्यालयात फेब्रुवारी 2025 च्या 4 थ्या दिवशी वा त्यापूर्वी सादर करणे आवश्यक आहे किंवा वरील सदर तारखेहून अधिक विलंब नसलेल्या तारखेला कंपनी लिक्वीडेटर पोस्टाने पाठवाव्यात. एखादा धनको ज्यास वर दिलेल्या सदर तारखेस मर्यादित कालावधीत पुरावा असलेले त्यांचे प्रतिज्ञापत्र सादर करण्यात अपयशी ठरेल त्यास त्याचे कर्ज सिद्ध होण्यापूर्वी लाभांशाचे कोणतेही वाटपाचा लाभ देण्यापासून, अशा वाटपाला हरकत घेण्यासाठी, जसे प्रकरण असेल त्यानुसार, वगळले जाईल.
एखादा धनको ज्याने पुरावा पाठवला आहे, त्याने जर कंपनी लिक्वीडेटरकडून लेखी नोटीसद्वारे अशा नोटीशीत दिलेल्या अशा वेळ व ठिकाणी असे कर्ज वा दाव्याची तपासणी करण्यासाठी स्वतः वा त्याच्या प्रतिनिधीद्वारे उपस्थित रहावे आणि गरजे लागेल त्यानुसार त्याच्या कर्ज वा दाव्याचा त्यापुढील असा पुरावा सादर करावा.
**जानेवारी 2025 च्या 20 व्या दिवशी दिनांकित**
**राजेंद्र देवीदास पुराणिक**
**कंपनी लिक्वीडेटर**
पत्ता : फ्लॅट क्र. 54, गोरेगाव पूर्व, प्रथमेश को–ऑप. हाऊसिंग सोसायटी लि.,
वनराई कॉलनी, हब समोर, गोरेगाव पूर्व, मुंबई–400065.
आयबीबीआय नोंदणी क्र. आयबीबीआय/आयपीए–001/आयपी–पी02029/2020-2021/13149
(एएफए 31.12.2025 पर्यंत वैध)


# फोंड्यात स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त युवकांची पदयात्रा

टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १९ :** सेवा संस्थेतर्फे फोंड्यात स्वामी विवेकानंदांच्या जयंती निमित्त युवकांची पदयात्रा सेवा संस्थेतर्फे १२जानेवारी सकाळी फोंडा येथे स्वामी विवेकानंद जयंती निमित्त पदयात्राचे आयोजन करण्यात आले होते त्यात विविध उच्च माध्यमिकच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला त्यात सरस्वती उच्च माध्यमीक, अमेय उच्च माध्यमीक, जी. व्ही.एम्स.उच्च माध्यमिक व पी.ई.स उच्च माध्यमीक




विद्यालयाच्या विद्यार्थी उपस्थित होते, स्वामी विवेकानंदांच्या जय घोषाने फोंडा परीसर तरुणांनी दणाणून सोडला .

मंच्यावरील कार्यक्रम आल्मेदा हायस्कूलच्या सभागृहात झाला त्यात डॉ.प्रो. महेश नारायण ढवळीकर मुख्य अतिथी म्हणून लाभले तसेच सन्माननीय अतिथी म्हणून युवा उद्योजक पुतुसत्या या आस्थापनाचे मालक मयुर खोलकर, जी. व्ही.एम्स कामकाज कमिटीचे अध्यक्ष कृष्णा शेट्ये, सरस्वती उच्च माध्यमीक विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती सरिता परब, पी.ई.स उच्च माध्यमीकच्या सहायक प्राध्यापक डॉ. रसिका देसाई गावकर व सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मच्छिंद्र शिरोडकर उपस्थित होते.

डॉ. प्रा. महेश ढवळीकर याने स्वामी विवेकानंदांचे विचार आजच्या युगात अत्यंत महत्त्वाचे आहे व तरुणांनी त्यांचे विचार आत्मसात करावे असे आवाहन केले. मयुर खोलकर यांनी आजच्या तरुणांनी नोकरी करणारे न होता नोकरी देणारे व्हावे असे जमलेले सर्व तरुण–तरुणीना संबोधले ममता कुट्टीकर यांनी सुत्रसंचलन केले व श्री दिनेश प्रियोळकर यांनी आभार मानले. यावेळी पदयात्रा प्रमुख दत्ता दिना शेट, गौतम तळावलीकर, विरेंद्र शिरोडकर, काशीनाथ परवार, दिनेश गावडे व सेवा संस्थेचे सर्व सदस्य आणि स्वयंसेवक उपस्थित होते.

# श्रम–धाम संकल्पने अंतर्गत दुसऱ्या टप्प्यातील ९ घरांची बांधणी निश्चित

टीम दैनिक हेराल्ड

**▶ फेब्रुवारी महिन्यात होईल बांधकामास प्रारंभ**

**आगोंद, दि. १५ :** मला आपल्या भावना कळतात, वेळ जरी गेलेली असली तरी यापुढे मी आपल्याला श्रमधाम योजनेमार्फत नवीन घर लवकरच बांधून देईन, अशी प्रतिक्रिया श्रम–धाम योजना संकल्पना राबवविणारे सभापती रमेश तवडकर यानी व्यक्त केली.

यावेळी काणकोण भाजप मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर गावकर आणि भाजपाचे संतोष गावकर, व्यंकटेश गावकर, संतोष गावकर, उल्हास गावकर आणि माजी पंच सदस्य तुकाराम गावकर ह्यांच्या उपस्थीत श्रीमती सत्यवती लक्ष्मण गावकर ह्याच्या घराची काल रोजी, पाहणी केली. सभापती श्री. तवडकर यांनी श्रीमती सत्यवती परिवाराबद्दल जाणून घेण्याचा प्रयत्न यावेळी केला.

अनेक वर्षा मागे आपल्या पतीचे दिर्घ आजाराने निधन झाले. एक विकलांग मुलगा होता. त्याचे पण दिर्घ आजाराने निधन झाले. सद्या या घरांत आपण एकटीच राहत आहे. दयानंद सुरक्षा योजनेच्या विधवा मानधन महिन्याला २ हजार रुपया वर आपल्या पोटाची खळगी भरत आहे. वय पण झालेले असल्यामुळे दुसऱ्यांच्या घरी कामाला जाऊ शकत नाही. अन्य उत्पन्नाचा स्त्रोत पण काहीच नाही, मी सद्या एकाएकी जीवन जगत आहे, असे श्रीमती सत्यवती यांनी सांगितले.

तीची सर्व कहाणी ऐकून सभापती श्री. तवडकर काही वेळ स्तब्ध झाले. आपल्या भावना कळतात, वेळ जरी गेलेली असली तरी मी आपल्याला श्रमधाम योजनेमार्फत नवीन घर बांधून देईन. असा शब्द तिला दिला.


**Indian Overseas Bank**
इण्डियन ओवरसीज़ बैंक
Good people to grow with
www.iob.in

**इंडियन ओव्हरसीज बँक, फोंडा शाखा (१९५७)**
राजकृष्ण टॉवर्स, बिल्डींग क्र. ए, गाळा क्र. 10-16,
शांतीनगर, फोंडा, गोवा– 403401.
ईमेल : iob957@iob.in

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई–लिलावाकरिता जाहीर सूचना**

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, 2002 (2002 चा क्र. 54 वा) खाली बँकेकडे गहाण टाकलेल्या स्थावर मालमत्तांची विक्री**

ज्याअर्थी, इंडियन ओव्हरसीज बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने खालील कर्ज खात्यांमधील सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 13(2) खाली पाठवलेल्या मागणी सूचनांच्या अनुषंगाने खालील मालमत्तांचा ताबा त्या आमच्या पूर्ण देय रकमेची होईपर्यंत त्यावरील व्याज व किमतींसह बँकेच्या देय रकमेची वसुली करण्याकरिता **‘जसे आहे जेथे आहे’, ‘जे आहे जे काही आहे,’ व ‘तेथे जे जे काही आहे’** या तत्वावर विकण्याच्या हक्कासह घेतला आहे आणि ज्याअर्थी, सदर देय रकमेची परतफेड करण्यात अपयश आल्याने सदर कायद्याच्या कलम 13(4) खाली त्यास प्रदान झालेल्या अधिकारांसह सदर मालमत्तांच्या विक्रीद्वारे बँकेला देय रकमेची वसूली करण्याचा प्रस्ताव आहे. खाली सही करणाऱ्याद्वारे **https://baanknet.com** या वेबपोर्टलवर पुरविलेल्या ई–ऑक्शन प्लॅटफॉर्मद्वारे सदर विक्री केली जाईल.
**कर्जदार/गहाणवटदाराचे नाव व पत्ता** : 1. **श्री. अनंत मार्केटिंग (प्रोप्रा.: श्री. सिद्धेश आनंद शेट वेरेकर), पत्ता** : गाळा क्र. 1, वेरेकर बिल्डींग, अप्पर बाजार, फोंडा, गोवा 403401. **कायम पत्ता** : गाळा क्र. 13, वेरेकर बिल्डींग, अप्पर बाजार, फोंडा, गोवा 403401. **पत्रव्यवहाराचा पत्ता** : गाळा क्र. 1, वेरेकर बिल्डींग, अप्पर बाजार, फोंडा, गोवा 403401, **कार्यालय पत्ता** : गाळा क्र. 1, वेरेकर बिल्डींग, अप्पर बाजार, फोंडा, गोवा 403401. 2. **मे. मयूर सेल्स कॉर्पोरेशन (प्रोप्रा. : सिद्धेश आनंद शेट वेरेकर), पत्ता** : गाळा क्र. 1, वेरेकर बिल्डींग, अप्पर बाजार, फोंडा, गोवा 403401. कायम पत्ता : गाळा क्र. 13, वेरेकर बिल्डींग, अप्पर बाजार, फोंडा, गोवा 403401. पत्रव्यवहाराचा **पत्ता** : गाळा क्र. 1, वेरेकर बिल्डींग, अप्पर बाजार, फोंडा, गोवा 403401. **कार्यालय पत्ता** : गाळा क्र. 1, वेरेकर बिल्डींग, अप्पर बाजार, फोंडा, गोवा 403401. 3. **सिद्धेश आनंद शेट वेरेकर, रुद्रेश शेट वेरेकर, आनंद गोविंद शेट वेरेकर व अश्विनी आनंद शेट वेरेकर,** कायम **पत्ता** : बंगला क्र. 4, फ्रेंड्स कॉलनी, खडपाबांध, फोंडा, गोवा 403401, पत्रव्यवहाराचा **पत्ता** : बंगला क्र. 4, फ्रेंड्स कॉलनी, खडपाबांध, फोंडा, गोवा 403401. हमीदार–गहाणवटदारांचे नाव व **पत्ता** : 1. **सिद्धेश आनंद शेट वेरेकर, रुद्रेश शेट वेरेकर, आनंद गोविंद शेट वेरेकर व अश्विनी आनंद शेट वेरेकर, कायम पत्ता** : बंगला क्र. 4, फ्रेंड्स कॉलनी, खडपाबांध, फोंडा, गोवा 403401, **पत्रव्यवहाराचा पत्ता** : बंगला क्र. 4, फ्रेंड्स कॉलनी, खडपाबांध, फोंडा, गोवा 403401.
**एनपीए तारीख : 28.05.2024, मागणी सूचना तारीख : 06.06.2024, मागणी सुचनेतील दावा केलेली देय रक्कम : दि. 01.06.2024 रोजी रु. 95,54,603.12/- अधिक त्यापुढील व्याज व किमती. ताबा घेतल्याची तारीख : 16.12.2024, कब्जा सुचनेतील दावा केलेली देय रक्कम : दि. 16.12.2024 रोजी रु. 1,03,11,359.54/- अधिक त्यापुढील व्याज व किमती. दि. 18.01.2025 रोजी देय रक्कम : रु. 1,04,59,021.97/- अधिक त्यापुढील व्याज व किमती.**
***स्थानिक स्व शासन (मालमत्ता कर, पाणी सांडपाणी, वीज देयके इ.) : माहित नाहीत.**

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

फ्रेंड्स कॉलनी, खडपाबांध, फोंडा, गोवा येथील सर्व्हे क्र. 204/7 असलेल्या घरभाट या नावाच्या मालमत्तेच्या क्र. 23 मध्ये बांधलेल्या ब्लॉक क्र. 4 असलेल्या बंगल्याचे समभाग गहाणवट. प्लॉटचे क्षेत्रफळ 370 चौ.मी. आहे. बंगल्याचे बिल्ट अप क्षेत्रफळ 160 चौ.मी. आहे. सदर बंगला **श्री. आनंद गोविंद शेट वेरेकर, श्रीमती अश्विनी आनंद गोविंद शेट वेरेकर, श्री. सिद्धेश आनंद गोविंद शेट वेरेकर व श्री. रुद्रेश आनंद गोविंद शेट वेरेकर** यांचे नावे असून बंगल्याशी निगडीत प्लॉटचे क्षेत्रफळ 179 चौ.मी. आहे.
**राखीव किंमत व बयाणा रक्कम ठेव खालीलप्रमाणे आहे :**

| सुरक्षा तपशील | राखीव किंमत | बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) | बोली वाढ मूल्य |
|---|---|---|---|
| वर वर्णिलेली मालमत्ता | रु. 1,09,82,576.00/- | रु. 10,98,257.60/- | रु. 50,000/- |

लिलावाची तारीख व वेळ : **21.02.2025,** सकाळी **10.00** ते संध्या. **4.00,** बोली वाढ मूल्य : रु. **50,000/-.** स्वयंचलित विस्तार वेळ : **10** मिनिटे. ज्ञात भार, काही असल्यास : **काही नाहीत.**
बोलीदारांनी ग्लोबल ईएमडी वालेट खात्यात **20.01.2025** रोजी सकाळी **10.00** ते **21.02.2025** रोजी संध्या. **4.00** पूर्वी ऑनलाईन प्रणालीने ईएमडी भरणा जमा करावा.
*सांविधिक देय रकमांपेक्षा बँकेच्या देय रकमेस जास्त महत्व आहे. अटी व शर्तीसाठी कृपया भेट द्या : **https://baanknet.com/**

**दिनांक : 18.01.2025**
**ठिकाण : फोंडा**

**सही/–**
**प्राधिकृत अधिकारी**
**इंडियन ओव्हरसीज बँक**


# नेहमी चांगल्या गोष्टींचा अवलंब करा

## प्रतापसिंह राणे | भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १९ :** तुम्ही या देशाचे भावी नागरिक आणि नेते आहात त्यामुळे उत्तम नेता होण्यासाठी आजपासूनच प्रयत्न करा. तुमच्याकडे नेतृत्व गुण आहेत त्यांचा योग्य उपयोग करा.शाळा ही फक्त शिक्षणासाठी नसून तुम्हाला एक जबाबदार नागरिक घडविण्याचे ठिकाण आहे. देशाची प्रगती तुमच्या हातात आहे. त्यामुळे नेहमी चांगल्या गोष्टींचा अवलंब करा. असे उद्गार माजी मुख्यमंत्री तथा पर्ये येथील श्री भूमिका शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रतापसिंह राणे यांनी काढले.

पर्ये सत्तरी येथील श्री भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ नुकताच विद्यालयाच्या सभागृहात पार पडला.त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.यावेळी त्यांच्यासोबत व्यासपीठावर व्यवस्थापक शिवाजीराव राणे सरदेसाई, प्राचार्य यशवंत सावंत,उपप्राचार्य रावसाहेब राणे, संस्थेचे सचिव कुष्टा राणे, संस्थेचे खजिनदार शंकर च्यारी, पालक शिक्षक संघटनेचे खजिनदार गुरुप्रसाद मांद्रेकर तसेच शिक्षक वर्ग विद्यार्थी उपस्थित होते.




पर्ये : श्री भूमिका विद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांना गौरविताना प्रतापसिंह राणे. सोबत शिवाजीराव राणे सरदेसाई, यशवंत सावंत, रावसाहेब राणे, कुष्टा राणे, शंकर च्यारी व गुरुप्रसाद मांद्रेकर.

कार्यक्रमाची सुरुवात इशस्तवनाने करण्यात आली.त्यानंतर मान्यवरांचे फुलांनी स्वागत केले.

विज्ञान शाखेतील भूमी पार्सेकर, इशा केरकर, साईशा गावस व गीतारवादक जियाद बेग यांनी एक गीत सादर केले.

विज्ञान शाखेतील ओमकार साळकर, वाणिज्य शाखेतील पिंटू माली,कला शाखेतील पूर्वा देविदास खरपालकर व व्यावसायिक शाखेतील निष्का नाईक यांना उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून निवडून गौरविण्यात आले. तर कला शाखेतील प्राची गावकर व वाणिज्य शाखेतील अखिल शिंदे यांना यंदाच्या वर्षी हुशार विद्यार्थी म्हणून गौरविण्यात आले होते.

तसेच युवा वैज्ञानिक शुभम सामंत व संस्कार पाटील, उत्कृष्ट क्रीडापटू विद्यार्थी प्रकाशकुमार द्रिदी व क्रीडापटू विद्यार्थिनी राणी डेंगवेकर यांची निवड करून गौरविले. हुशार क्रीडापटू विद्यार्थिनी म्हणून एंजल लोपेश हिला पारितोषिक प्राप्त झाले.

अकरावीच्या विज्ञान शाखेतील दूर्वा राणे सरदेसाई हिने आपले विचार व्यक्त केले व बारावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.तसेच बारावीच्या विज्ञान शाखेतील कु.संस्कार पाटील याने आपला दोन वर्षांचा अनुभव कथन केला.

यावेळी विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षिका तृप्ती कवळेकर यांनी केले. तर कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी संघटनेच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षक महादेव सुतार यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.


**खरेदी–विक्री**

**Prop Sale**
Two BHK House (old) at Desai Nagar, Sanquelim built on 400 sq mtrs NA Plot for sale. Contact: 9923283098